॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥

पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूर. संचलित

# कवठेकर प्रशाला,

## नाथ चौक, पंढरपूर

**अमृत महोत्सवी वर्ष (२०२२-२०२३)**

# PROSPECTUS

## माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज

सन २०२३-२४ साठी दि. ०२ मे २०२३ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू.


संपर्क : **श्री. व्ही. वाय. पाटील**

(मुख्याध्यापक, कवठेकर प्रशाला, पंढरपूर)

मो. ९८८१६२८९७९




|| तमसो मां ज्योतिर्गमय ||

मुख्याध्यापक

## श्री. विठ्ठल यादव पाटील

B.Sc. B.Ed. DSM

मोबा : ९८८१६२८९७९



१ डिसेंबर २०२२ रोजी कवठेकर प्रशाला, नाथ चौक, पंढरपूर येथे मुख्याध्यापक पदभार स्विकारला. दि. ७/१२/१९९२ पासून सहशिक्षक, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक म्हणून ३२ वर्षे सेवा केली. शैक्षणिक कामातील प्रदीर्घ अनुभव. शास्त्र व गणित विषयाचे उत्तम अध्यापन, तसेच एक विद्यार्थीप्रिय, शिक्षक प्रिय, शिस्तप्रिय, गुणांची पारख असणारे, तळमळीचे हाडाचे शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. ते एक उत्तम सायकलपटू असून त्यांनी ६ वेळा १०० किमी व अनेक वेळा ५० किमी अंतर लीलया पार केले आहे. सर एक उत्कृष्ट हॉलीबॉल पटू आहेत. मुख्याध्यापक पदाचा पदभार स्विकारताच त्यांनी शालेय कामकाजात अमूलाग्र बदल घडवून आणले. संपूर्ण शालेय कामकाज संगणकीकरण करण्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या कवठेकर प्रशालेच्या मुख्याध्यापकांची कारकीर्द प्रशालेच्या, संस्थेच्या दृष्टीने शैक्षणिक उन्नतीची घडणार याची आम्हाला खात्री आहे.

## कवठेकर प्रशाला, नाथ चौक, पंढरपूर

# प्रशालेची ठळक वैशिष्ट्ये

१. इयत्ता दहावीच्या निकालाची चढती कमान.
२. बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये पंढरपूर शहरांमधील सर्वाधिक विद्यार्थी.
३. शंभर टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी.
४. अनेक विद्यार्थ्यांना विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण.
५. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांचेकडून राज्यस्तरावर पारितोषिक मिळवणारे विद्यार्थी.
६. शाळेमधील आणि संस्थेमधील बहुसंख्य शिक्षक एस.सी.आर.टी.च्या विविध समित्यांवर कार्यरत.
७. शाळेमधील बहुसंख्य शिक्षक हे पुणे बोर्ड यांच्याकडे परीक्षक, नियामक आणि मुख्य नियामक म्हणून कार्यरत.
८. काही शिक्षकांचे बालभारती आणि इतर सरकारी शालेय पुस्तक निर्मितीमध्ये योगदान.
९. राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरावर विविध विषयांचे शिक्षक तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्यरत.
१०. पुणे विभागातील इयत्ता दहावीचे कॉपीमुक्त आणि उत्कृष्ट परीक्षा केंद्र म्हणून नावलौकिक.
११. शाळेतील सर्व शिक्षक तंत्र स्नेही असून कोरोना काळामध्ये जवळपास सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाईन तास घेतले.
१२. कित्येक शिक्षकांचे यूट्यूब चॅनेल आजही कार्यरत.
१३. क्रीडा क्षेत्रामधील आमचा दबदबा आजही कायम.
१४. शहर, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये आमचे विद्यार्थी नेहमीच चमकतात.
१५. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल, मुंबई यांचे तालुक्यातील एकमेव यशस्वी परीक्षा केंद्र.
१६. या परीक्षांमधून यशस्वी झालेले विद्यार्थी आज राष्ट्रभर संगीत आणि नृत्याचे मार्गदर्शक म्हणून कार्यरत.
१७. नृत्य, नाट्य, सिनेमा आणि छोटा पडदा त्याचप्रमाणे आजकाल चर्चेत असणाऱ्या यूट्यूब टॅनेलच्या माध्यमातून विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत.
१८. या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना शाळेमधून पोषक वातावरण आणि उत्तम मार्गदर्शन
१९. महाराष्ट्र राज्य कला संचालनालय, मुंबई यांचे कडून घेतल्या जाणाऱ्या चित्रकला परीक्षांचे परीक्षा केंद्र शाळेत असून त्यातून महाराष्ट्राचे भावी चित्रकार घडवण्याचे काम शाळा करत आहे.
२०. इयत्ता दहावी पर्यंत असणाऱ्या केंद्र शासनाच्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांचा लक्षणीय सहभाग आणि नजरेत भरणारे यश हे आमचे वैशिष्ट्य.
२१. या स्पर्धा परीक्षांमध्ये नवोदय विद्यालय, एन.एम.एम.एस.परीक्षा, एम.टी.एस.परीक्षा, एन.टी.एस.परीक्षा इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी घेतली जाणारी स्कॉलरशिप परीक्षा यांचा समावेश.
२२. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांचे कडून घेतल्या जाणाऱ्या विविध इंग्रजी परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र आमच्या प्रशालेत.
२३. महाराष्ट्र हिंदी राष्ट्रभाषा सभा, पुणे यांचे मार्फत हिंदी विषयाच्या घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र.
२४. संस्कृत विषयाच्या घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे मार्गदर्शन आणि परीक्षा केंद्र.
२५. आमचे विद्यार्थी आज सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, न्याय, भारतीय सेना दल, संरक्षण, संशोधन, कृषी, बँकिंग इत्यादी क्षेत्रात सर्वोच्च पदावर कार्यरत.



















योगिराज, पंढरपूर, ९४२२३८०१४६